## रे. दिवाणी मुकदमा नं.८५/२०१८ मधील नि.६४ वरील आदेश
## (जालिंदर केरु सुर्यवंशी वि. राजू बाबूराव सुर्यवंशी वगैरे)
(**CNR:MHSN**12000665-2018)

वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.३ व प्रतिवादी नं. २७ चे वारस रेकॉर्डवर मुदतीत न आणल्याने त्याकामी झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करणेसाठी दाखल केलेला आहे.

२. वादींचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे–

सदर कामातील प्रतिवादी नं. ३ शोभा आनंदराव पाटील ह्या दि. ०३/११/२०२१ रोजी कृष्णा हॉस्पीटल कराड येथे तसेच प्रतिवादी नं. २७ लक्ष्मण संभाजी सावंत हे दिनांक २६/०८/२०२० रोजी मयत झालेले असून त्यांचे वारस वेळेत रेकॉर्डवर न घेतल्याने अबेटमेंटचा आदेश झालेला आहे. सदर अबेटमेंटचा आदेश रद्द करुन वारस रेकॉर्डवर आणणेस विलंब झालेला आहे. सदर वादी यांना कायद्यातील तरतुदीचे पुरेसे ज्ञान नसलेने प्रतिवादी नं. ३ व प्रतिवादी नं. २७ यांचे मयत वारस रेकॉर्डवर आणता आले नाहीत. वादी यांनी जाणूनबूजून विलंब केलेला नाही. सदरचा विलंब माफ होणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. तसे न झाल्यास वादी यांचे नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी नं. ३ व प्रतिवादी नं. २७ यांचे वारस रेकॉर्डवर आणणेस झालेला विलंब माफ करण्यात यावा अशी वादी यांनी विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी नं. १ ते १४ यांनी नि. ७३ ला त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. त्यामध्ये प्रतिवादींनी कथन केले की, वादीचा प्रस्तुत अर्ज त्यांना मान्य नसून वादीने प्रतिवादी नं. ३ व २७ यांचे वारस रेकॉर्ड घेणेस किती दिवसांचा विलंब झालेला आहे याचे योग्य कारण दिलेले नाही. सबब वादीचा अर्ज नामंजूर करणेत यावा. यदाकदाचित मे. कोर्ट वादीचा अर्ज मंजूर करणेच्या निर्णयाप्रत आलेस वादीला र. रु. २०००/– इतका दंड करावा अशी प्रतिवादींनी विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादी तर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा हा वादी यांनी डिक्लरेशन व निरंतर ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. वादी यांनी याकामी विलंब माफीचा अर्ज, अबेटमेंट सेट असाईडचा अर्ज आणि अर्ज दुरुस्तीचा अर्ज दाखल केलेला आहे. सदर कामी जर वादी यांचा अर्ज नामंजूर करणेत आला तर त्यांचे पैशाने न भरुन येणारे असे नुकसान होणार आहे. परंतु सदरचा अर्ज मंजूर झाला तर प्रतिवादी

यांना त्यांची बाजु मांडण्याची संधी उपलब्ध असणार आहे. त्याचप्रमाणे अर्जाचे निराकरणासाठी त्याची मदत होणार आहे. त्यामुळे वादीतर्फे कथनाचा विचार करता सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. वादीचा नि.६४ चा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. सदर कामी प्रतिवादी नं.३ व प्रतिवादी नं. २७ चे वारस रेकॉर्डवर मुदतीत न आणल्याने त्याकामी झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येतो.

IRFAN ALI KHAN YOUSUF ALI KHAN
Digitally signed by IRFAN ALI KHAN YOUSUF ALI KHAN
Date: 2022.09.15 13:13:06 +05'30'

**पलूस** **( आय. ए. वाय. ए. खान )**
**दिनांक–१४/०९/२०२२** **सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पलूस.**

**<u>CERTIFICATE</u>**

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Mrs. S. V. Kadam<br>Stenographer Grade III |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Palus |
| Date | : | 14/09/2022 |
| Signed by P. O. on | : | 14/09/2022 |
| Uploaded on | : | 15/09/2022 |